सोमवार,
दि. ७ जानेवारी, २०१३

# प्रतिवाद



## चला, इंधन वाचवू...

महाराष्ट्रात दररोज दोन कोटींहून अधिक चुली पेटवल्या जातात. प्रत्येक चुलीसाठी सरासरी पाच किलो लाकडे धरली तर रोज दहा कोटी किलो लाकडे जाळली जातात. जागतिक आरोग्य संघटनेच्या २००२ च्या अहवालानुसार भारतात दरवर्षी चुलीतून बाहेर पडणाऱ्या धुरांमुळे पाच लाखांहून अधिक महिला आणि बालके मृत्युमुखी पडतात. नियोजन आयोगाने २००५ मध्ये प्रसिध्द केलेल्या अहवालात एलपीजी आणि गॅसवर यापुढील काळात सबसिडी देणे अशक्य असल्याचे नमूद केल्यानंतर अनेकांचे डोळे उघडले. याचाच अर्थ रोज धोके वाढू लागले आहेत आणि आपण मात्र या धोक्यांकडे अगदी ढिम्मपणे पाहत बसलो आहोत. सातारा जिल्ह्यातील असंख्य गावे मात्र याला अपवाद ठरली असून गेली अनेक वर्षे या गावांनी हजारो झाडांची कत्तल रोखली. या गावांना यासाठी काही फार कष्ट करावे लागलेले नाहीत, मात्र त्यांनी केलेले प्रयत्न कौतुकास्पद आहेत. खाऊ की गिळू म्हणणाऱ्या पारंपरिक इंधन आणि इंधन निर्मितीला बाजूला ठेवूनच डोंगरकपारीत राहणाऱ्या गावांनी बायोगॅसची शक्कल लढविली. सातारा जिल्ह्यातील असंख्य गावांनी इंधन म्हणून शंभर टक्के बायोगॅसचा पर्याय निवडला आहे. महाराष्ट्रातील पहिले 'सोलर व्हिलेज' म्हणून पाटण तालुक्यात मान्याचीवाडी गावाची ओळख आहे. येथे 'घर तेथे बायोगॅस' आहे. जावळी तालुक्यातील वाळंजवाडीच्या तत्कालीन सरपंच जनाबाई देसाई यांनी 'घर तेथे बायोगॅस' ही संकल्पना राबविली आणि ती प्रत्यक्षातही उतरविली. परिणामी, येथे दरवर्षी शेकडो झाडांची तोड थांबली. सातारा तालुक्यातील आसगाव येथेही घरोघरी बायोगॅस आहे. कोरेगाव तालुक्यातील धामणेर, भिवडी, मोहितेवाडी येथेही ग्रामस्थांनी इंधनाला पर्याय म्हणून बायोगॅसची निवड केली. कराड तालुक्यातील भोळेवाडी आणि सातारा तालुक्यातील साबळेवाडी येथे शौचालयापासून वीजनिर्मितीचा प्रयोग सुरू केला. तो थोडे दिवसच राहिला. येथील ग्रामस्थांनी वीजनिर्मितीला पर्याय म्हणून दिलेल्या उपक्रमाची दखल घ्यावी लागते. विशेष म्हणजे टेरेसवरसुध्दा बायोगॅस बसविता येतो, हे सातारा येथील सामाजिक कार्यकर्ते डॉ. अविनाश पोळ यांनी दाखवून दिले. यासाठी शेण अथवा मलमूत्रही लागत नाही. रोजच्या जेवणातील शिल्लक राहिलेले शिळे अन्न, भाजीपाल्याचे देठ, फळांच्या साली, कोंडा, चहाची शिल्लक राहिलेली पावडर यावर हा गॅस चालतो. यातून चार माणसांचे रोजचे जेवण होते. पर्यावरणाला हानिकारक असा वायूदेखील यातून निर्माण होत नसल्यामुळे इंधन वाचविण्यासाठी याच्यापेक्षा सोपा अन् सहजसाध्य असा दुसरा कोणताही पर्याय शोधून सापडणार नाही. अशी कितीतरी उदाहरणे गावपण टिकवून ठेवणारी आहेत. त्याचे अनुकरण प्रत्येक गावांनी करायलाच हवे.

**– मोहन मस्कर-पाटील**